REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

# मोगलांच्या दक्षिणेवरील स्वाऱ्या व अहमदनगरच्या निजामशाहीचा अंत : एक शोध

प्रा.डॉ.नारायण सूर्यवंशी
(M.A.,M.Phil.,Ph.D)
इतिहास विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक, शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अंनतपाळ जि.लातूर.



सन १५२६ ला झालेल्या पहिल्या पानिपतच्या लढाईने बाबराने दिल्लीतील इब्राहीम लोदीची सत्ता सपुष्ठात आणली. तेथुनच मोगल सत्तेची सुरूवात झाली. बादशहा बाबरला व हुमायुनला दक्षिण भारतावर वर्चस्व प्रस्थापित करता आले नाही,मात्र दिल्लीचा मोघल बादशहा अकबर याच्या काळापासून दक्षिण भारताकडे त्यांचे लक्ष लागले होते. मोगल सम्राट अकबराने अहमदनगरवर स्वारी करून इ. स. १५९६ मध्ये वऱ्हाड प्रांत मोघल साम्राज्याखाली आणला असा उल्लेख अबुल फजलच्या नोंदीत आला आहे.[१] इ. स. १५१९ मध्ये अकबरने खानदेश मोघल साम्राज्याला जोडला तेव्हापासूनच उत्तरेकडील सम्राट दक्षिणेच्या राजकारणात प्रत्यक्ष हस्तक्षेप करू लागले.[२]

सम्राट जहांगीरच्या काळात मोघल सरदारांच्या आपापसातील वैर आणि मतभेदांमुळे तसेच निजामशाहीचा सरदार मलिक अंबरच्या कडक विरोधामुळे दक्षिणेतील राज्यांत विशेष ढवळाढवळ झाली नाही. परंतु शहाजहान बादशहाच्या काळात अकबराचे साम्राज्यवादी धोरण शहाजहानने पुढे चालू ठेवले. दक्षिण भारतातील खानदेशाचे राज्य खालसा केल्यानंतर मोगलांचा हल्ला अहमदनगरच्या निजामशाहीवर होणार हे अटळ होते.

याच काळात अहमदनगरच्या निजामशाहीतही अंतर्गत संघर्ष सूरू होता. निजामशही अंतर्गत द्वेषाने व वैरामुळे पोखरली होती. बुऱ्हाण निजामशहाच्या मृत्यूनंतर त्याचा जेष्ठ पुत्र इब्राहीम यास गादीवर बसविले. अल्पकाळात एका चकमकीत तो ठार झाला. त्यानंतर त्याचा पुत्र बहादूर.[३] यास चांदबिबीने गादीवर बसविले. त्याच वेळी सरदारांनी वेगवेगळ्या ठिकाणी वेगवगळे निजाम घोषीत केले होते. शेवटी चाँदबिबीने राज्यकारभार आपल्या हातात घेतला. तिने राज्यातील गोंधळ नाहीसा करून शांतता प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात तिला पूर्ण यश येऊ शकले नाही. मियॉमंजूने बहादूर शहाला गादीवरून हटवून त्याला जोंडच्या किल्ल्यात ठेवले व चाँदबिबीला नजर कैदेत ठेवले.[४] अभंग खान याने विजापूरकरांशी संगनमत करून बुरान निजामशहा पहिला याचा मुलगा मिरान शहाअली यास त्याचा मुलगा अलिसह बिड येथे आणून त्याला निजामशाही सुलतान म्हणून घोषीत केले. परिणामी मियाँमंजू याने दिल्लीचा मोगल राजपुत्र मुराद याला अहमदनगर वर चालून येण्यासाठी बोलाविले. यावेळ अकबराचा पुत्र शहामुराद दक्षिणेच्या सरहद्दीवर होता. दक्षिणेवर स्वारी करून संपूर्ण दक्षिण देश जिंकून घेण्याचा त्याचा विचार होता. त्याच वेळी अहमदनगरचा सरदार मियाँ मंजू याने मुरादला अहमदनगरविरूध्द यापूर्वीच अकबराने दक्षिण पाठविले होते. अकबराच्या हुकूमावरून मुराद सैन्यासह अहमदनगरकडे निघाला. राजपुत्र मुरादला राजाअली खान व अब्दुलरहिम खान–ई–खानान हे सरदार येऊन मिळाले.हे मोघली सैन्य निजामाची राजधानी अहमदनगरला पोहचण्या आधिच मियाँमंजू याने आपला शत्रू इखालस खान याचा पराभव करून त्याने गादीवर बसविलेला निजामशहा मोती शाहास ताब्यात घेतले. ही घटना २० सप्टेंबर १५९५ मध्ये घडली. आता मियॉमंजू याला मोघली सैन्याच्या मदतीची आवश्यकता उरली नाही. परंतु सैन्य तर येऊन ठेपले. तेव्हा त्याने मोघली सैन्याचा प्रतिकार करण्यास सुरूवात केली. मोघली सैन्याच्या पुढे त्याचे कांहीच चालेना. शेवटी राज्यकारभाराची सर्व सुत्रे चाँद बिबीच्या हाती देऊन तो अहमद निजामशहास सोबत घेऊन बाहेर पडला त्याने विजापूर व

गोवळकोंड्याच्या सुलतानाची मदत मिळविण्याचा प्रयत्न चालविला. या सुमारास १८ डिसेंबर १५९५ रोजी शहामुराद व अब्दुलरहीम खानखाना यांच्या नेतृत्वाखाली मोगल सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा दिला.तपूर्वी चाँदबिबीने सर्व सरदारांच्या संमतीने बहादूर यास सुलतान म्हणून घोषीत केले होते.[५] निजामशाहीतील अंतर्गत कारस्थानांना उत आला होता. सध्या निजामशाहीत चार सुलतान सत्तेवर होते. प्रत्येक सरदाराचा एक सुलतान अशी आवस्था निजामशाहीची झाली. चाँदबिबीने मोघलाचा मुकाबला चालविला होता. मोघलांच्या पुढे तिची मात्रा चालत नव्हती शेवटी तिने मोघलांचे वर्चस्व मान्य केले व २३ मार्च १५९६ ला मोघलांशी तह करून वऱ्हाड प्रांत मोघलांना दिला.[६] मोघलांनी बहादूर यास सुलतान म्हणून मान्यता दिली.

चाँद बिबीने अंतर्गत कलह नष्ट करण्यासाठी आपला पुतण्या विजापूरचा इब्राहीम आदिलशहा याची मदत घेतली. परिणामी निजामशाहीचा पेशवा व वकील हे पद असणारा मनसबदार मुहम्म्द खान नाराज झाला. इब्राहीम आदिलशहाचा निजामशाहीतील हस्तक्षेप त्याला आवडला नाही. म्हणून त्याने मुघल सरदार खान – इ– खानान यास अहमदनगरवर स्वारी करण्यासाठी निमंत्रण दिले. खान–इ–खानास अहमदनगरवर चढाई करावी असे वाटत होते परंतु राजपुत्र मुराद त्याला सहमत नव्हता. शेवटी अबुलफजल याला दक्षिणेवर पाठवून खान–इ–खनास परत बोलावले. २ मे १५९९ रोजी मुराद मृत्यू पावला व त्याच्या जागी राजपुत्र दानियल याची नियुक्ती झाली. राजपुत्र दानियल याने अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा दिला. शेवटी चाँदबिबीने अहमदनगरचा किल्ला मोघलांच्या स्वाधीन केला. चाँदबिबीने मोघलांशी हातमिळवणी केल्याच्या संशयावरून किल्ल्यातील लोकांनी व जिनाखान याने ३ जुलै १६०० मध्ये तिचा खून केला.इ. स. १६०० मध्ये मोघलांनी अहमदनगरचा किल्ला जिंकून घेतला व निजामशाही समाप्त झाल्याची घोषणा केली. औसा उदगीर, लातूर अहमदपूर या भागावर इ. स. १६३६ पर्यंत अहमदनगरच्या निजामशाहीचे वर्चस्व होते. जरी मोघलांनी अहमदनगरचा किल्ला घेऊन निजामशाही समाप्त झाल्याची घोषणा केली असली तरी मलिक अंबर या निजामशाही सरदाराने निजामशाही टिकवून ठेवण्यात यश मिळविले.उलट मलिक अंबरने वऱ्हाड, बुऱ्हाणपूर गुजरात या प्रांतावर स्वाऱ्या करून लुटालूट करून मोघलांना हैरान करून सोडले.[७] निजामशाहीचा वजीर मलिक अंबर व सरदार शहाजी राजे भोसले यांनी निजामशाहीचे राज्य जीवंत ठेवण्यासाठी मोगलांशी ४० वर्षे संघर्ष केला. इब्राहीम आदिलशहाची मदत घेतली . शेवटी मलिक अंबरचा मृत्यू मे १६२६ मध्ये वयाच्या ८० व्या वर्षी झाला. त्याच्या वजीर पदावर त्याच्यानंतर त्याचा मुलगा फत्तेखान हा आला. त्यानेही मोघलांशी संघर्ष सूरूच ठेवला. त्याच काळात ७ नोव्हेंबर १६२७ मध्ये मोगल बादशहा जहांगीराचा मृत्यू झाला.[८] राजपुत्र शहाजहान हा दिल्लीच्या राजगादीवर आला. त्याने कंधार जिंकण्यासाठी नासिरखानच्या नेतृत्तवाखाली प्रचंड सैन्य पाठविले.[९] या सैन्याने इ. स. १६३१ मध्ये कंधारच्या किल्ल्याला वेढा दिला. निजामशाहीचा वजीर फत्तेखानच्या मदतीला विजापूरच्या आदिलशहाने सैन्य पाठविले. तरीही मोघली सैन्याच्या जोरापुढे फत्तेखानाचे काहीच चालले नाही. ७ मे १६३१ मध्ये कंधार किल्ला मोघलांनी जिंकुन घेतला.मोघल सरदार महबतखान याने दौलताबादच्या किल्ल्याला वेढा दिला आणि आंबरकोट आणि महाकोट हे किल्ल्यातील महत्त्वाचे भाग जिंकले. शेवटी निजामशाहीचा वजीर फत्तेखान १७ जून १६३३ ला मोघलांना शरण आला. त्याने दौलताबादचा किल्ला मोघलांच्या हवाली केला.शहाजीराजांनी निजामशाही घराण्यातील लहान मुलगा मुर्तजा निजामशाहा (तिसरा) यास पेमगिरी येथे गादीवर बसविले व संघर्ष चालूच ठेवला. इ. स. १६३५ पर्यंत अहमदनगरचा फार मोठा प्रदेश दिल्लीच्या मोगल बादशहाच्या सत्तेखाली आला होता. उदगीर, औसा, लातूर या भागावर निजामशहाचेच कांही सरदार स्वतंत्रपणे राहत होते.ते या ठिकाणाचा ताबा मुघल बादशहाच्या हाती देण्यास तयार नव्हते. या काळात सर्व घडामोडी आजच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा येथून घडत होत्या.दिल्लीचा मोगल बादशहा शहाजहान स्वत: २१ सप्टेंबर १६३५ ला आगऱ्याहून दक्षिणेकडे निघाला आणि १६३६ ला बुऱ्हाणपूरला पोहचला. तेथून तो दौलताबादच्या किल्ल्यात आला. तेथून त्याने खान दौरान या सरदाराला २०,००० हजार घोडदळ देऊन उदगीर व औसा किल्ले घेण्यासाठी पाठविले. तिची बक्शीगिरी व वाकियानवीस इसहाक बेग याला दिलेली होती. त्यापूर्वी बादशहा शहाजहान याने आदिलशाहीने बंडाखोरांना मदत करून नये व खंडणी दौलताबादला पाठवावी अशा आशयाचे फर्मान पाठविले. नाईलाजाने आदिलशहाने मीर अबूल हसन आणि काजी अबू सईद हे दोन वकील शहाजहानकडे पाठविले. त्यांनी शहाजहानची भेट घेतली व ६ मे १६३६ रोजी ते शहाजहानच्या आज्ञेने परत निघाले.[१०] आदिलशाही व मोघल यांच्यात तह घडून आला. त्या तहाच्या मसूद्यावर आदिलशाहाने सह्या केल्या व मोघल–आदिलशाही मध्ये शांतता प्रस्थापीत केली. या तहात आदिलशहाला अनेक अटींना मान्यता द्यावी. लागली.[११] आदिलशहाने फर्मानावर सही–शिक्का मोर्तब करून ते हिरे, माणिक, हत्ती व भेटवस्तूसह मुक्रमखानास बरोबर तहाचे फर्मान १ जून १६३६ रोजी बादशहाकडे पाठविले. या पूर्वीच्या बादशहाच्या आदेशाप्रमाणे खान दौरान सैन्य घेऊन कंधारला पोहचवून तेथून तो उदगीरकडे निघाला. पुढे भालकीहून उदगीरपासून तीन कोसावर देवणी या गावी आला. खान दौरान यास कुतूबशाही व निजामशाही राज्याच्या सीमेवर नियुक्त करण्यात आले. खान

जहाँ यास आदिलशाही राज्यावर हल्ला करण्यासाठी रवाना केले.आदिलशहाने शरणागती पत्करल्यानंतर शहाजहानने राजपुत्र औरंगजेब यास इ. स. १६३६ मध्ये दक्षिणेचा सुभेदार म्हणून नियुक्त केले व दौलताबाद सोडले.

## उदगीरचा किल्ला मोघलांच्या ताब्यात :-

औरंगजेब दक्षिणेत आल्यावरही शहाजीराजांच्या हालचाली चालूच होत्या. आदिलशाही बरोबर तह जरी झाला असला आणि उदगीर व औसा किल्ले मोघलांना देण्याचे ठरले असले तरी ते किल्ले अजून मोघलांच्या हातात आले नव्हते.गोवळकोंड्यांची-कुतूबशाही, विजापूरची-आदिलशाही व अहमदनगरची-निजामशाही यांच्या मध्यभागी अथवा तीन शाह्यांच्या सिमेवर हे औसा व उदगीरचे किल्ले होते. आदिलशाहीशी तह झाल्यानंतर खान दौरान या मोघली सरदारला असे वाटत होते की, उदगीर किल्ल्याचा ताबा शांततेने मिळेल, परंतु तसे न होता किल्लेदार उदगीर किल्ला मोघलांना देण्यास तयार नव्हता.त्यामुळे १७ ऑगस्ट १६३६ रोजी किल्ल्याला वेढा देऊन किल्ल्याची तटबंदी सूरूंग लाऊन उडविली.याच किल्ल्यात दुसऱ्या इब्राहीम आदिलशहाचा नातू होता. त्याला इजा होऊ नये म्हणून पुढील कार्यवाही टाळली व शेवटी तेथील एका सैनिकाला मोघलांनी त्यांच्या तयारीची कल्पना दिली. त्याने किल्ल्यात जाऊन किल्लेदाराला सत्यस्थितीची कल्पना दिली परिणामी किल्लेदार सय्यद मिफ्ताह हबशी याने २८ सप्टेंबर १६३६ रोजी मोघली सैन्यापुढे शरणागती पत्करली.[१२] अशा रितीने उदगीरचा किल्ला मोगलांच्या हाती आला. खान दौरानने उदगीर व औशाचा किल्ला जिंकला. उदगीर व औशाच्या किल्ल्याच्या पाडावाने निजामशाहीचा शेवट झाला.

उदगीरच्या किल्ल्यात कमानीच्या डाव्या बाजूला एका हिरव्या रंगाच्या सपाट प्रस्तरावर फार्सी भाषेत एक शिलालेख आहे. तो आलेख जैनोल आबेद्दीन याने लिहिल्याचा उल्लेख आहे. किल्ल्यातील इतर शिलालेखापेक्षा हा आलेख सर्वात मोठा आहे.

मराठीत या लेखाचा अर्थ खालील प्रमाणे आहे.

शहाजहानच्या काळात दिनांक सात जमादिउल आवलला हिजरी १०४६ (इ. स. १६३७) या शुभ वेळी उदगीरच्या किल्ल्याचा फत्ता बुर्ज शहाजहानच्या हुकुमान्वये जिंकला गेला आणि त्याच महिन्याच्या ४ तारखेला ह्या शाही घराण्याचा गुलाम मोगलखाँ जौनाखाँ कोका यांच्या ताब्यात दिला गेला. या किल्याचा संपूर्ण अधिकार हिजरी १०४७ (इ. स. १६३८)मध्ये घेतला गेला.

या शिलालेखाच्या चारी कोपऱ्यात यामोईन,याफताह,यारफी,याकरीम ही देवाची नावे कोरलेली आहेत.[१९६]

हा शिलालेख ऐतिहासिक दृष्टीने महत्त्वाचा असून आपण वर पाहिल्याप्रमाणे १६३६ मध्ये बादशहा शहाजहानने स्वत: दौलताबादला येऊन खान दुरान याला उदगीर किल्ला घेण्यासाठी पाठविले होते. या शिलालेखाप्रमाणे इ. स. १६३७ मध्ये उदगीरचा किल्ला मोगलांच्या ताब्यात पूर्णपणे गेला आणि मोगलखाँ कोका या मोगल घराण्याच्या गुलामाच्या हाती तो सोपविला. आलेखात फक्त तारखेची चूक दिसते. दिनांक ७ जमादिऊल आवल १०४६ ला हा किल्ला जिंकला आणि त्याच महिन्याच्या चार तारखेला तो मोगलखाँ कोकाच्या ताब्यात दिला गेला, हे शक्य वाटत नाही. हा किल्ला चार जमादऊल आवलला जिंकला असावा आणि त्याच महिन्याच्या सात तारखेला मोगल खाँच्या ताब्यात दिला गेला असावा.

वरील विवेचनावरून आपणास उदगीरचा किल्ला मोगलांच्या हाती गेल्याचा विश्वसनीय ऐतिहासिक संदर्भ ह्या शिलालेखात मिळतो.

उदगीर व औशाचे किल्ले औरंगजेबाने सहज घेतले. निजामशाहीचे राज्य जिंकून घेण्यासाठी मुघली सामर्थ्याला चाळीस वर्षाचा कालावधी लागला.

## उदगीर येथील मोगल किल्लेदार :-

औरंगजबाने इ. स. १६३६ मध्ये उदगीरचा किल्ला जिंकल्यानंतर मोगलखाँ कोकाच्या पूर्वी फक्त एक वर्षासाठी(१६३६-३७) खुदावन्दखाँ हा उदगीरचा किल्लेदार होता. त्याच्यानंतर मोगलखाँ कोका हा १६४८ पर्यंत या किल्ल्याचा किल्लेदार राहिला. त्यानंतर मिर्जा हिस्सामोद्दीन हा किल्लेदार झाला. त्याला लवकरच किल्लेदार पदावरून दूर केले पुढे १६५७ मध्ये त्याला उदगीरचा किल्लदार म्हणून नियुक्त केले. याच्या काळातील कांही इमारती उदगीर किल्ल्यात आहेत. वारसा यूध्दात औरंगजेब विजयी झाला. ३१ जुलै १६५८ रोजी तो दिल्लीचा बादशहा झाला.त्याच्या काळात खातमखाँ हा उदगीरचा किल्लेदार होता. त्याने किल्ल्यात भव्य इमारत बांधली होती. त्यावर त्याने फार्सी भाषेत एक शिलालेख कोरला तो खालील प्रमाणे आहे.

याफत दर आहेरे शाहेआलमगीर
किलेदारी किले उदगीर
कमतरीन खानाजार खातमखाँ
के पूरअज येते अद दास्त जमीर
दरसने आलफ आरबा ओ तसईन
करद आँ कसरे दिलकुश तामीर (१०९४)

याचा मराठी अर्थ खालील प्रमाणे

अलमगीरच्या म्हणजे औरंगजेबाच्या काळात ह्या किल्ल्याची किल्लेदारी प्राप्त झाली. आलमगीरला माझ्यासारख्या य:कश्चित खातम खाँवर अत्यंत विश्वास होता.हा महेल दिल-कुशा हीजरी १०९४ म्हणजेच इ. स. १६८५ मध्ये बांधण्यात आला.अशाच पद्धतीचे आणखीन दोन शिलालेख याच उदगीर किल्ल्यात कोरलेले असून, त्यावरून या किल्ल्याच्या किल्लेदाराचे नाव व त्याने केलेल्या कामाचा तपशिल मिळतो. तसेच दिल्लीचा बादशहा औरंगजेब होता. त्याची या भागावर सत्ता होती हे स्पष्ट होते.

खातम खाँ किल्लेदाराच्या नंतर औरंगजेबाच्या काळात उदगीरच्या किल्ल्यावर मुक्तारखाँ सवजवारी , सजावरखाँ, सजावार उल्मुल्क या किल्लेदाराचा उल्लेख आहे.

सजावर उल्मुल्कच्या काळापासून उदगीर ही त्याची जाती जहागीर झाली. याच्या नंतर त्याचा मुलगा हिस्सामुल्लाखाँ किल्लेदार झाला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा जहांगीर यारजंग उदगीर किल्ल्याचा किल्लेदार झाला.

निजाम- उल-मुल्क असफजहा याने १७२४ मध्ये स्वत:चे स्वतंत्र राज्य जाहिर केले. त्यावेळी जहाँगीर यारजंग हा किल्लेदार होता. त्याने निजामाचे सार्वभौमत्त्व मान्य केले. त्यामुळे पुढेही त्याची जहागीर चालूच राहिली.

निजाम कालखंडात किल्लेदारात आदला बदल झालेली दिसते.

### औसा किल्ल्याचे मोघल किल्लेदार :-

इ. स. १६३६ मध्ये औरंगजेबाने औसा किल्ला जिंकल्यानंतर त्या किल्ल्याचा किल्लेदार म्हणून मुबारकखान नियाजी याची नियुक्ती केली. इ. स. १६४२ मध्ये त्याची औशाच्या किल्ल्याच्या किल्लेदारीवरून काबुल प्रांतात बदली करण्यात आली.

उजबेकखान हा इ. स. १६४२ मध्ये औशाचा किल्लेदार झाला. तो किल्लेदार म्हणून दहा वर्षे राहिला.[१३] औरंगजेब दिल्लीच्या गादीवर आला त्यावेळी बर्खुदारखान हा औशाचा किल्लेदार होता. याच काळात शिवाजी महाराजांनी या परिसरावर मोहिम काढल्याचा उल्लेख बर्खुदारखानाच्या पत्रात मिळतो. त्याने बादशहाकडे युध्द साहित्याची मागणी केली होती. त्याची नोंद २३ जानेवारी १६७१ च्या पत्रात आहे.

त्यानंतर सुहराबखान हा औशाचा किल्लेदार होता असे दिसते. याच्या काळात औसा येथे जामा मश्जिद बांधली. मशिदीतील शिलालेखात या मशिदीसाठी औरंगजबाने अनुदान दिले होते.

या जामा मशिदीतील शिलालेखात सोहराब खानाचा उल्लेख आहे.

दर जमान शाह दीन औरंगजेब गो बागिती
साया लुफ खुदा अस्त
बंदा अश असमान वो दिल सोहराबखान
बाबी इ मशिद नुसहत मुजाहस्त

सय्यद अन्वरखान याला २० जून १६८१ ला औशाची किल्लेदारी मिळाली. त्याच्या नंतर ताजुद्दीन ऊर्फ मुर्शद कुलीखान हा इ. स. १६८५ मध्ये औशाचा किल्लेदार होता. पुढे नसरूल्ला हा किल्लेदार होता. त्याला इ. स. १६९४ मध्ये फिरोजगडच्या किल्लेदारीवर नेमण्यात आले.त्याच्या जागी मुहम्मद सादुल्लाखान याची नेमणूक केली असे औरंगजेबाच्या दरबाराच्या बातमीपत्रातून दिसते.

पुढे मुईनखान हा औशाचा किल्लेदार झाला.याच्याच काळात औरंगजेब दक्षिणेत मराठी सत्ता नष्ट करण्यासाठी उतरला. त्याने ९ ऑगस्ट १६९९ मध्ये धारूरचा फौजदार उजबेकखान याकडे औसा, निलंगा, हा भाग सोपविला.

औरंगजेबाने दक्षिण भारत जिंकून घेऊन त्याची विभागणी सुभ्यात केली. लातूर, उदगीर, औसा, नांदेड हा भाग बिदर सुभ्यास मोडत होता. या सुभ्यावर अस्करखान याची नेमणूक केली. असदुल्ला खान यास इ. स. १७०३ पर्यंत औशाचा किल्लेदार, त्यांनतर परंड्याचा किल्लेदार इज्जतखान याला औशाच्या फौजदारीवर पाठविल्याची नोंद दि. ९ फेब्रुवारी १७०३ मध्ये मिळते.२ मार्च १७०३ रोजी हुजूरात याला औशाच्या किल्लेदारीवर बोलावण्यात आले. नोव्हेंबर १७०४ ला इज्जतखानला औशाच्या किल्लेदारी व फौजदारीवर पूर्ववत नेमण्यात आले.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर दक्षिणेत इ. स. १७२४ साली चिनकिलीजखान याने हैद्राबाद येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली. पुढे हा किल्ला त्याच्या ताब्यात गेला.

## निष्कर्ष

१. दिल्लीचा मोगल बादशाहा अकबर याने दक्षीणेवर स्वारी केली.
२. निजामशाही सरदार मलिक अंबर हा पराक्रमी होता.
३. शहाजहानने बादशहा अकबराचे साम्राज्यवादी धोरण पुढे चालु ठेवल्याचे दिसते.
४. अहमदनगरच्या निजामशाही अंतर्गत संघर्ष असल्यामुळेच मोगलांना दक्षिणेत प्रवेश करता आला.
५. चाँदबिबीने निजामशाहीचे राज्य काही काळ सावरुन धरले व शांतता प्रस्तापित केली.
६. चाँदबिबीने मोघलसत्तेला दक्षिणेत सत्तास्थापनेपासुन काही काळ रोखुन धरले.
७. मोघलांनी सन १६०० मध्ये अहमदनगरचा किल्ला जिंकून घेतला.
८. मोघलांनी अहमदनगरचा किल्ला घेऊन निजामशाही समाप्त झाल्याची घोषणा केली असली तरी मलिक अंबर या निजामशाही सरदाराने निजामशाही टिकवून ठेवण्यात यश मिळविले.
९. शहाजीराजांनी निजामशाही घराण्यातील लहान मुलगा मुर्तूजा निजामशहा (तिसरा) यास पेमगिरी येथे गादीवर बसविले व मोघलाबरोबर संघर्ष चालुच ठेवला.
१०. उदगीर,औसा,लातूर,कंधार,परंडा या प्रदेशातील किल्ल्यांवर निजामशाही सरदारांचेच वर्चस्व होते.
११. बादशहा शहाजहाने या भागावर वर्चस्व प्रस्थापित करण्यात यश मिळविले.
१२. बादशहा शहाजहानने राजपूत्र औरंगजेबास दक्षिणेचा सुभेदार म्हणून नियुक्त केले.

## संदर्भ ग्रंथ

१. राजन अमीताभ, डॉ. गाडगीळ, डॉ. देव (संपा.),स्थानिक इतिहास आणि साहित्य एक शोध ,नांदेड, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड , १९८६, पृ. ७५.
२. राठोड राजाराम थावरा, उदगीर इतिहास आणि स्मारके,महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर,१९६८,पृष्ठ –१६
३. कुंठे भ.ग.,(अनु.) अहमदनगरची निजामशाही,मुरली प्रकाशन,मुंबई,१९६२,पृ. २८२
४. डॉ. कठारे अनिल व डॉ. दळवे अरुण, राष्ट्रकुटांची राजधानी –कंधार,कल्पना प्रकाशन,नांदेड,२००५ पृ. ५२
५. खरे ग. ह.,मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास,मुंबई,२००१,पृ. १४८
६. कुंठे भ.ग., अनु. अहमदनगरची निजामशाही, उपरोक्त, पृ ३०८
७. लातूर जिल्हा गॅझे.,भाग १,दर्शनिका विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई २००८,पृ. ९०
८. Gaz. of India, Maharashtra State Gaz., History, Part-II ,Medieval Period, Govt. of Maharashtra, 1972,Page- 282
९. Gaz. of Nanded District, Govt. of Maharashtra, 1971, Bombay,page- 56
१०. मेहंदळे गजानन, राजा शिवछत्रपती , खंड पहिला, भाग१ , मेहंदळे प्रकाशन, पुणे १९९६, पृ. ५४९–५५१
११. Maharashtra State Gaz., Part -II,ibid,Page- 302-303
१२. सय्यद, अनिस महान, औरंगजेब, सोमय्या पब्लिकेशन प्रा. लि., मुंबई,१९७७, पृ. १८.
१३. हंचाटे नारायणराव, दै. गुरुधर्म, दीपावली विशेषांक, औसा, १९८१, पृ. ४